विशेष दिवाणी दावा क्र.५६/२०२२
भागिरथीबाई वि. नामदेव

## नि.क्र.५१ खालील आदेश

**०१.** सदरकामी वादीतर्फे ऑनलाईन स्वरुपात त्यांच्या विधीज्ञांनी अर्ज दिला की, वकिलांकडे वादी ऑफीसावर गेली असता तिने वकील बदलायचे आहेत असे सांगितले आणि वकिलांची फी दिली नाही. तसेच, कोणतीही कागदपत्रे वादी घेवून गेलेली नाही किंवा वकिलांना काम चालवण्याबद्दल सूचना दिल्या नाहीत. त्यामुळे, नि.क्र.५० वर जर प्रतिवादींनी म्हणणे दिले व युक्तीवाद करावयाची वेळ आली तर वादीचे विधीज्ञ करु शकणार नाहीत. साक्षीदाराचे शपथपत्र देता येत नाही. त्यामुळे, प्रकरणी पुढील तारीख मिळावी.

**०२.** वादी न्यायालयासमोर हजर आहेत. त्यांच्यासोबत त्यांचे पती बालाजी हे हजर आहेत. नि.क्र.५० हा अर्ज वादीने देवून मा. उच्च न्यायालयातील रिट याचिकेचा निकाल होईपर्यंत नि.क्र.३७ वरील दुरुस्ती वादीस करता येत नाही असे नमूद केले होते. आजरोजी वादीने या याचिकेचा निर्णय दाखल केला. याचिका फेटाळण्यात आली आहे. त्यामुळे, नि.क्र.३७ प्रमाणे दुरुस्ती करणे वादीचे काम आहे. अशी दुरुस्ती वादीने आजरोजी करणे अपेक्षीत होते. तसे केलेले नाही.

**०३.** वादीच्या प्रकरणाची फाईल सध्याचे वकील श्री. विहिरे यांच्याकडे असणार आहे, ती ताब्यात मिळेपर्यंत नवीन वकील याकामी काहीही करु शकणार नाहीत आणि सदरचे प्रकरण आणखी काही वर्षे लांबण्याची शक्यता आहे. त्यामुळे, नेमलेल्या तारखेस वादीने आपल्या वकिलांसह हजर रहावे व आवश्यक तजवीज करावी अन्यथा वेगळा आदेश न करता, याच आदेशाने दावा रद्द करण्याचे समजण्यात यावे. वादीस आदेश कळावा म्हणून तो जाणिवपुर्वक मराठी भाषेत केलेला आहे.

स्वाक्षरीत/-

**[एस.एन.सरडे]**
दिनांक:१६/०३/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर